नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०७/२०२६ (गुरूवार )**

# रामटेक येथे मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी घेतली जनसंवाद व तक्रार निवारण जनसभा

नागरिकांच्या तक्रारी व समस्या जाणून घेऊन त्यांचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे जनसंवाद व तक्रार निवारण जनसभा आयोजित केली होती.

या जनसभेदरम्यान मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी नागरिकांसोबत थेट संवाद साधला. सदर जनसभेमध्ये रामटेक परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन त्यांच्या विविध समस्या व तक्रारी मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षकांसमोर मांडल्या. मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी नागरिकांच्या तक्रारी व समस्या ऐकून घेत संबंधित अधिकारी व अंमलदारांना आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे नियमानुसार व तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश दिले.

सदर सभेला श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन रामटेक आणि पोलीस स्टेशन रामटेक चे अधिकारी/अंमलदार हजर होते.


पोलीस स्टेशन रामटेक
नागपूर ग्रामीण पोलीस
वार्षिक निरीक्षण
तक्रार निवारण जनसभा
रामटेक
श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.)
अधीक्षक ,नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
बरकते
श्री राजेश कुमार थोरात






पोलीस स्टेशन रामटेक
नागपूर ग्रामीण पोलीस
वार्षिक निरीक्षण
तक्रार निवारण
रामटेक
मा. श्री
पोद्दार (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक
(ग्रामीण), नागपूर
श्री रमेश
राजेश कुमार थोरात
उपविभागीय पोलीस अधिकारी
रामटेक विभाग रामटेक

# मा .वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी घेतले रामटेक पोलीस स्टेशनचे वार्षिक निरीक्षण

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी रामटेक पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण केले. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील विविध विभाग, गुन्हे अभिलेख, शस्त्रागार, मालखाना तसेच इतर कामकाजाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या.

वार्षिक निरीक्षणादरम्यान पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित गुन्ह्यांचा तपास, तपासाची गुणवत्ता, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या पोलीस सेवांचा आढावा घेऊन मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अधिकारी व अंमलदारांना आवश्यक मार्गदर्शन केले.


ग्रामीण पोलीस



# सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांची प्रभावी कारवाई

# म्युल अकाउंट्सची माहिती प्राप्त करून पडताळणी; ३१ गुन्हे दाखल

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात सायबर गुन्हेगारी तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या घटनांना आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून सातत्याने प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सायबर गुन्हयांमध्ये आर्थिक व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या म्युल अकाउंट्सवर विशेष लक्ष केंद्रित करून, संबंधित बँक खात्यांची माहिती प्राप्त करून त्यांची पडताळणी करण्यात येत आहे. **महाराष्ट्र राज्यात म्युल अकाउंट्सवर सर्वाधिक गुन्हे नागपुर ग्रामीण जिल्हयात नोंद करण्यात आले आहे.**

सायबर गुन्हेगारांकडून ऑनलाइन फसवणुकीतून प्राप्त झालेली रक्कम विविध बँक खात्यांमध्ये वळविण्यासाठी अनेकदा इतर व्यक्तींच्या नावाने उघडण्यात आलेल्या किंवा कमिशनच्या आमिषाने वापरण्यात येणाऱ्या बँक खात्यांचा वापर केला जातो. अशा खात्यांना **म्युल अकाउंट्स म्हणतात**. या खात्यांचा वापर सायबर फसवणुकीतील पैशांची देवाणघेवाण, हस्तांतरण आणि पुढील खात्यांमध्ये पैसे वळविण्यासाठी केला जातो. महाराष्ट्र सायबर यांच्या कडुन नागपूर ग्रामीण पोलीसांनी अशा संशयित बँक खात्यांची माहिती प्राप्त करून त्यांचे सखोल विश्लेषण व पडताळणी केली. संबंधित खात्यांमधील आर्थिक व्यवहार, व्यवहारांची पद्धत, संशयास्पद रकमेचे हस्तांतरण तसेच सायबर फसवणुकीशी असलेला संबंध याबाबत तपास करण्यात आला. **या तपासादरम्यान नागपूर ग्रामीण जिल्हयात कलम ६१(२) ,३१८(४), ३(५), ११२ (२) भान्यासं अन्वये एकूण ३१ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. या प्रकरणांमध्ये नविन कायदा भारतीय न्याय संहिता कलम ११२ (संघटित गुन्हेगारी) अन्वये प्रभावी कारवाई करण्यात आली असून, संबंधित आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयांचा सखोल तपास करीत आहेत.**

सायबर गुन्हेगारांना आर्थिक व्यवहारांसाठी उपलब्ध होणाऱ्या अशा खात्यांवर नियंत्रण ठेवणे, संशयास्पद आर्थिक व्यवहारांची वेळीच ओळख पटविणे आणि सायबर फसवणुकीच्या

साखळीवर आळा घालणे या उद्देशाने ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी कमिशन किंवा आर्थिक लाभाच्या आमिषाने आपले बँक खाते, एटीएम कार्ड, पासबुक, इंटरनेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंगची माहिती इतर कोणालाही वापरण्यास देऊ नये असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात येत आहे.

## गडचिरोलीतील खून प्रकरणातील विधीसंघर्षग्रस्त बालकाचा नागपूरमधून शोध
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण आणि गडचिरोली पोलीसांची संयुक्त कारवाई

**गडचिरोली जिल्हयातील धानोरा पोलीस ठाणे हद्दीत रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकाच्या खून प्रकरणात घटनेनंतर सदर गुन्हयातील विधीसंघर्षग्रस्त हा मिळुन येत नव्हता. स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण आणि गडचिरोली पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सदर विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले.**

**बालकाचा नागपूर शहरातील सिरसपेठ परिसरातून शोध घेतला असता सदर विधीसंघर्षग्रस्त बालक मिळुन आला.दिनांक १५/०७/२०२६ रोजी पोलीस ठाणे धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे दाखल अपराध क्रमांक ७९/२०२६, कलम १०३ भारतीय न्याय संहिता या गुन्ह्यातील विधीसंघर्षग्रस्त बालक हा घटनेच्या दिवसापासून फरार होता. सदर गुन्ह्यातील निष्पन्न व पाहिजे विधीसंघर्षग्रस्त बालक नागपूर शहरातील सिरसपेठ परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणच्या पथकाने गडचिरोली पोलीसांसह त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.**

**नागपूर शहरातील सिरसपेठ परिसरात शोध घेतला असता, सदर विधीसंघर्षग्रस्त बालक त्याच्या राहत्या घरी मिळून आला. त्यास त्याच्या पालकांच्या समक्ष विचारपूस केली असता, त्याने सदर गुन्हा केल्या बाबत माहिती दिली.गडचिरोली पोलीस पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

# अंमली पदर्थ गांजा ची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, पुरवठादार आरोपीला सुध्दा अटक,सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १५/०७/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे पथक कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, किल्लापुरा सावनेर **येथे एक महीला तिच्या घरी** अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. सदर पथकाने माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक,तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन सावनेर पोलीसांसह संयुक्त कारवाई करत घटनास्थळी जावुन नमुद महीला आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीच्या हिरवट काळपट रंगाचे पाणी, फुले, कळी, बोंडे व बिया **असलेला अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.पोलीसांनी सदर गांजा पुरवाठा करणाऱ्या आरोपीबाबत विचारपुस केली असता पंकज पारवे, रा. नागपूर** हा आरोपी असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहीतीच्या आधारे आरोपी **पंकज गंगाराम पारवे, वय ४५ वर्षे, रा. हजारी पाहड,गिटटी खदान नागपूर याला नागपुर येथुन ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ४१५ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा किंमती १२४५०/— रूपये , एक डब्बा त्यात गांजा अमली पदार्थ खाली केलेले ९३ लहान प्लॅस्टीक पाने कि. १५००/— रूपये, गांजा विक्री करून मिळवलेली रोख रक्कम ४८०/— रूपये चा, किपॅड मोबाईल किंमती १०००/— रूपये , ॲड्राईड मोबाईल किंमती ८,०००/— रूपये असा एकुण किंमती २५,८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.नमुद प्रकरणी दोन्ही आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ८(क),२०(ब) (ii)एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

# अवैध अग्निशस्त्राचा वापर करून नीलगायीची शिकार करणाऱ्या आरोपींताविरूध्द गुन्हा नोंद , आरोपी अटक

पोलीस स्टेशन पाचगाव :— **पोलीस स्टेशन पाचगाव हद्दीतील उटी परिसरातील संजय नगरी येथील पडीत ले—आऊट परिसरात नीलगाय या वन्यप्राण्याची शिकार केल्याची घटना उघडकीस आली आहे. सदर प्रकरणी कलम ३, २५ शस्त्र अधी १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

दिनांक १५/०७/२०२६ रोजी पाचगाव पोलीस रात्रगस्त करीत असतांना रात्री ०२:३० वाजता उटी स्मशान घाटाचे बाजुला संजय नगरी येथील पडीत ले—आऊट परिसरात काही संशयीत हालचाली दिसल्या. पोलीस तेथे पाहणी करण्याकरीता जात असतांना काही इसम पळुन जाताना दिसले. पोलीसांनी एका इसमाला शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाला नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव अभिषेक पुनाराम आदोडे, वय ३८ वर्षे, रा. हेवती, तह, उमरेड, जि. नागपुर अशी माहीती प्राप्त झाली. तसेच घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळावर एक नर जातीची नीलगाय मृतावस्थेत आढळून आली.

**पोलीसांनी अभिषेक पुनाराम आदोडे यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार २)मनोज पवार, वय ३८ वर्षे, रा. राजुरवाडी, त. उमरेड, जि. नागपुर, ३) गुड्डु राजपुत, वय ४० वर्षे, रा. राजुरवाडी व इतर तीन साथीदारांनी भरमार बंदुकीच्या सहाय्याने नीलगायीची शिकार केल्याची माहिती दिली. पोलीसांनी घटनास्थळावरून हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल क्र. एम एच ४०—डी जी ४७७१, किंमती ४५०००/— रूपये ,सुझुकी बर्गमन मोपेड क्र. एम एच ४०—डीबी ००४२ किंमती ३५०००/— रूपये एसपी १२५ शाईन मोटारसायकल (विना क्रमांक) किंमती ४००००/— रूपये रेडमी कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमती ५०००/— रूपये असा एकूण १,२५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी अभिषेक पुनाराम आदोडे यास अटक करण्यात आली आहे.नमुद आरोपीला दिनांक १७/०७/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखा वरील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्तीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **क्रं १) लक्ष्मण भगवान पगारे, वय ३५ वर्षे, रा सिंदेवानी, ता. सावनेर, जि. नागपुर आणि क्रं २) छोटु बब्बु शेख, वय ४५ वर्ष, रा. बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **क्रं १) लक्ष्मण भगवान पगारे, वय ३५ वर्षे, रा सिंदेवानी, ता. सावनेर, जि. नागपुर आणि क्रं २) छोटु बब्बु शेख, वय ४५ वर्ष, रा. बडेगाव, ता. सावनेर, जि. नागपुर यांचेवर अवैध दारूचे अनेक गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद दोन्ही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय

दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद दोन्ही आरोपी **यांना १ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी लक्ष्मण भगवान पगारे**



**हद्दपार आरोपी छोटु बब्बु शेख**

## पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत अवैध जुगार खेळणाऱ्यांवर / खेळविणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक १५/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन नरखेड येथे अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहीत्य व रोख रक्कम असा एकुण ७,३५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

आरोपी नामे १)सतिश जगन्नाथ जांभळे वय ४५ वर्ष २)बालाजी मधुकर भोंगाडे वय ४३ वर्ष दोन्ही रा पिपळा केवळराम ३) दादाराव सहादेव चनकापुरे वय ५१ वर्ष रा. आग्रा त. नरखेड हे मौजा पिपळा केवळराम बस स्टॉप येथे **५२ तासपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, आहे तसेच** कृष्णा बापुराव बोरकर,वय ५४ वर्ष रा. पिपळा केवळरामत नरखेड हा मौजा पिपळा केवळराम आबादी जागेवर सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद. **असे एकुण महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण २ गुन्हे नोंद आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

दिनांक १५/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण २७४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे दिपक अशोक रघुसे, वय ३० वर्ष, रा. नक्षी, ता. भिवापुर, जि. नागपुर,यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) मोरेश्वर माधवराव बरवड, वय ४५ वर्षे, दोन्ही रा. वार्ड क्र ०५, धापेवाडा ता. कळमेश्वर २) महिला आरोपी यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे सुखदेव गौतम बांगडे, वय ६० वर्ष, रा. वॉर्ड क्र ०२, मंगसा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) कवडु नामदेव कारेमोरे, वय ५१ वर्ष, २) उमेश चंद्रभान आकरे, वय ३७ वर्ष, रा मोहाडी, ता. मौदा जि. नागपूर ३) रंजीत यादव शेन्डे, वय ३० वर्ष, रा. उमरचाडा, ता. तुमसर, जि. भंडारा, ह. मु. मोहरडी ता. मौदा जि. नागपूर ४) लोकेंदर मुनीराज सिंह, वय ३३ वर्ष, रा. मकान नं १, ग्राम रामपुर जुनारदार, अमरोहा, (उ. प्र.) ह. मु. मौदा, ता. मौदा, जि. नागपूर ५) शशांक शिवेंद्र, वय २० वर्ष, रा. ग्राम काटी.—६१, पतीयारी रेवा म. प्र. ह.मु. मौदा, ता. मौदा, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे आशिष राजेंद्र सहारे, वय ३६ वर्ष, रा. स्वामी विवेकानंद नगर, कन्हान याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे संजय नारायण उईके, वय ४७ वर्ष, रा. खापरी बारोकर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १) आरोपी नामे ओमप्रकाश उर्फ गोलु शंकरसिंग चव्हाण, वय ३० वर्ष, रा. बेलोना, त. नरखेड २) रविंन्द्र भागवत धुर्वे, वय ३७ वर्ष, रा. माणिकवाडा, त. नरखेड ३) शामसुंदर रामराव देशमुख, वय ४८ वर्ष, रा. थुगाव, निपानी त. नरखेड यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २८८० मिली देशी दारू, १४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण २७४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने